Lyceum India Journal of Social Sciences || ISSN (Online): 3048-6513
Volume: 3 Issue: 3 || February 2026 (Special Issue 1) || DOI: 10.5281/zenodo.18849463

# महात्मा जोतिबा फुले आणि त्यांचे स्त्री सुधारणा कार्य

**अनिल मनोहरराव देशमुख**[1]

**प्रस्तावणा :-**

एकोणिसाव्या शतकातील भारतीय समाजातील स्त्रीयांचे शोषण, सामाजिक असमानता, आणि शिक्षणवंचितता याविरूध्द संघर्ष करणाऱ्या महत्वपूर्ण समाजसुधारकांमध्ये महात्मा जोतिराव फुले यांचे नाव अग्रस्थानी आहे. भारताच्या सामाजिक इतिहासाचे विश्लेषण करताना एकोणिसावे शतक हे सामाजिक परिवर्तनाचे शतक मानले जाते. या काळात राजकीय पातळीवर इंग्रजी सत्ता दृढ होत असताना सामाजिक पातळीवर विविध विसंगती, अज्ञान आणि अंधश्रध्दा यांचे प्राबल्य होते. स्त्रियांना शिक्षणाचा अधिकार नव्हता, त्यांच्या हालअपेष्टा होत्या. भारतीय समाजाची रचना प्राचीन काळापासून पितृसत्ताक राहिली आहे. विवाह, शिक्षण, आर्थिक स्वातंत्र्य, आणि धार्मिक अधिकारांच्या बाबतीत स्त्रियांवर कठोर निर्बंध आणले. स्त्रियांना, शांत, घराबाहेर न पडणारी, पुरुषाधीन राहणारी अशी मर्यादा घालण्यात आली. शिक्षणाचा अधिकार नाकरला गेला. विधवांना मानवी सन्मानापासून वंचित ठेवण्यात आले. सतीप्रथा, बालविवाह, मुलींची गर्भात हत्या, दास्यता, मानसिक अत्याचार अशा असंख्य अन्यायांनी स्त्रियांचे जीवन वेढलेले होते.

एकोणिसाव्या शतकात पाश्चिमात्य शिक्षणाचा प्रभाव, ब्रिटीश राज्याची प्रशासनिक बदलांची प्रक्रिया, आणि विद्वानांचे नवचिंतन यामुळे सामाजिक जागृतीची चळवळ भारतात सुरु झाली. या कालखंडात राजा राममोहन रॉय, ईश्वरचंद विद्यासागर, यांच्यासह महात्मा फुले हे सर्वसमावेशक सुधारणावादी म्हणून सुधारणा चळवळीत उभे राहिले. जोतीराव फुले यांनी केवळ स्त्री मुक्तीचे उदात्त तत्वज्ञान प्रतिपादले नाही; तर प्रत्यक्षात शाळा उघडून, विधवांसाठी प्रसुतिगृह चालवून, सत्यशोधक समाजाच्या माध्यमातून सामाजिक कुप्रथांना आव्हान देऊन त्यांनी स्त्री पुनरुत्थानाची पायाभरणी केली. त्यांच्यासोबत सावित्रीबाई फुले या क्रांतिकारी स्त्रीने मराठी समाजात शिक्षणाचा दिवा पेटवला, प्रथम स्त्री शिक्षीका म्हणून योगदान दिले. म्हणूनच महात्मा फुले यांचे स्त्री सुधारक म्हणून महत्व अद्वितीय आहे.

**संशोधनाचा उद्देश :-**

१. महात्मा फुले यांच्या स्त्रीविषयक तत्वज्ञानाचा अभ्यास करणे.
२. महात्मा फुले यांच्या सुधारणांचा त्या काळातील स्त्रियांच्या जीवणावर झालेला प्रत्यक्ष परिणामाचा अभ्यास करणे.
३. आधुनिक भारतातील म्हणजेच आजच्या काळातील त्यांची प्रासंगिकता अभ्यासणे.
४. स्त्रीवादाच्या इतिहासात त्यांचे योगदान अभ्यासणे.

[1] संशोधक विद्यार्थी, ज्ञानोपासक महाविद्यालय इतिहास संशोधन केंद्र परभणी. स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड.

**संशोधनाची गृहीतके :-**

१. महात्मा जोतिबा फुले यांचे स्त्री शिक्षणाविषयीचे कार्य आधुनिक भारतातील स्त्री-सशक्तीकरणाच्या पायाभरणीस कारणीभूत ठरले आहे.

२. महात्मा फुले दांपत्याने चालवलेल्या शिक्षण व समाजसुधारणा उपक्रमांमुळे बालविवाह, स्त्रीशिक्षणाला विरोध यांसारख्या कुप्रथा कमी होण्यास गती मिळाली.

३. महात्मा फुले यांच्या सामाजिक विचारांनी पुढील सुधारणावादी नेत्यांना व चळवळींना दिशा दिली.

४. जर फुले दांपत्याने स्त्रीशिक्षणाची चळवळ आरंभ केली नसती, तर महाराष्ट्र व भारतातील स्त्रीशिक्षणाचा विस्तार विलंबित झाला असता.

**सामाजिक पार्श्वभूमी** :-

**बालविवाह, विधवा प्रथा :-**

एकोणिसाव्या शतकात बालविवाह सर्वत्र चालत असे. ६-१० वर्षाच्या मुलींचे विवाह होत असत. पतीचा मृत्यू झाल्यास विधवा स्त्रीला डोक्यावरील केस काढणे, पांढरे वस्त्र, उपासमार, सामाजिक बहिष्कार अशा शिक्षा मिळत.

**शिक्षणास बंदी :-**

स्त्रियांच्या शिक्षणावर बंदी घातली होती. या परिस्थितीत महात्मा फुले सुधारणांच्या बाजूने उभे राहिले आणि त्यांनी स्त्रीच्या स्वातंत्र्याच्या नवयुगाचा आरंभ केला.

**महात्मा फुले यांचा जीवन परिचय :-**

जोतिराव गोविंदराव फुले यांचा जन्म ११ एप्रिल १८२७ रोजी पुण्यातील धनकवडी येथे झाला. पुण्यातील स्कॉटिश मिशन स्कूलमधील शिक्षणाद्वारे त्यांच्या तर्कशुद्धता, नीतिमूल्ये आणि मानवी समता यांची जडणघडण झाली. स्कॉटिश मिशनच्या इंग्रजी शाळेत त्यांचे सदाशिव बल्लाळ गोवंडे, मोरो विठ्ठल वाळवेकर व सखाराम यशवंत परांजपे यासारखे जिवलग मित्र तयार झाले.

**भारतातील पहिली मुलींची शाळा :-**

१४ जानेवारी १८४८ रोजी जोतिरावांनी पुण्यातील बुधवारपेठेत 'तात्यासाहेब भिडे' यांच्या वाड्यात मुलींसाठी भारतातील पहिली स्वतंत्र शाळा सुरू केली. या शाळेची अध्यापिका म्हणून सावित्रीबाई फुले यांनी शिक्षणाचा पाया रचला. तेव्हा समज होता की मुलगी शिकली तर घर उध्वस्त होते, परंतु फुले दाम्पत्याने अशा चुकीच्या विश्वासांना प्रत्यक्ष कृतीने धक्का दिला. ही मुलींची शाळा सुरु करण्यासाठी त्यांना तात्यासाहेब भिडे, सदाशिव बल्लाळ गोवंडे, मोरो विठ्ठल वाळवेकर,

सखाराम यशवंत परांजपे, अण्णासाहेब चिपळूणकर, केशवराव भवाळकर व बापूसाहेब मांडे यांनी सहकार्य केले. या शाळेतील पहिल्या विद्यार्थ्यांनी अन्नपूर्णा जोशी, सुमती मोकाशी, दुर्गा देशमुख, माधवी थत्ते, सोनू पवार, जना कर्डिले या होत्या.

**सावित्रीबाई फुले :- सत्यशोधक चळवळीत योगदान**

सावित्रीबाई फुले या स्त्री शिक्षणाच्या इतिहासातील पहिल्या शिक्षिका, पहिल्या मुख्याध्यापिका आणि पहिल्या कवयित्री होत्या. त्यांच्या कवितांमध्ये स्त्रियांच्या दारिद्र्याचे विदारक चित्रण तसेच शिक्षणासाठी प्रेरणा देणारे संदेश आढळतात. सावित्रीबाईंच्या अनन्यसाधारण धैर्यामुळेच जोतिराव फुलेंची सुधारक चळवळ आकाराला आली.

**स्त्रियांना शिक्षणाचा अधिकार :**

महात्मा फुले यांनी स्त्रियांसाठी शिक्षणाची व्यवस्था उभारली. त्या काळात स्त्रियांना शाळेत बसण्याचा अधिकार नाकारला गेला होता तेंव्हा फुले दाम्पत्याने स्त्रियांना अक्षर ज्ञान दिले.

**बालहत्या प्रतिबंधक गृहाची स्थापना :-**

महात्मा फुले यांच्या काळात बालविवाहाची प्रथा प्रचलित होती. बालविवाह मुळे पतीच्या निधनानंतर खूप कमी वयात मुली विधवा होत. या विधवांना सक्तीचे वैधव्याचे जीवन जगावे लागत असे. विधवा स्त्रियांना समाजात अपमान व असुरक्षितता सहन करावी लागत होती. अशा स्त्रियांसाठी जोतिरावांनी २८ जानेवारी १८६३ रोजी उस्मान शेख यांच्या घरी बालहत्या प्रतिबंधक गृहाची स्थापना केली. या घराच्या पाटीवर 'विधवांनो येथे या सुरक्षितपणे बाळंत व्हा, सर्व काही गुप्त ठेवले जाईल व मुलांचे संगोपनही केले जाईल.' असे लिहिले होते. या कार्यात महात्मा फुले यांना लोकहितवादी, रा. गो. भंडारकर, न्यायमूर्ती रानडे, बाबा परमानंद, तुकाराम तात्या पडवळ यांनी सहकार्य केले होते.

**केशवपण पध्दतीविरुद्ध मोहीम :-**

समाजातील अन्यायकारक रूढी, परंपरावर प्रहार करताना महात्मा जोतिराव फुले यांनी विधवांच्या केशवपण पद्धतीचा तीव्र निषेध केला. विधवांचे डोके जबरदस्तीने मुंडन करून त्यांना अपमानित करणारी ही प्रथा अमानवी असल्याचे त्यांनी म्हटले. 'गुलामगिरी' व इतर लिखाणातून महात्मा फुले यांनी विधवांना शिक्षा दिल्याप्रमाणे जगायला लावणाऱ्या या पद्धतीवर टीका केली. स्त्री स्वातंत्र्य, शिक्षण आणि मानवी हक्काचा आग्रह धरून त्यांनी समाजात जागृती निर्माण केली आणि विधवा स्त्रियांवरील बंधने कमी करण्यासाठी मोहीम राबवली.

**महिला सेवा मंडळ :-** स्त्रियांच्या सुधारणेसाठी जोतिरावांनी पुण्याच्या कलेक्टरच्या पत्नी इ. सी. जोन्स यांच्या अध्यक्षतेखाली 'महिला सेवा मंडळ' ची स्थापना केली. सावित्रीबाई या मंडळाच्या चिटणीसही होत्या. २३ जानेवारी १८५२ रोजी महिलांसाठी सार्वजनिक तिळगुळ समारंभाचा कार्यक्रम घेण्यात आला होता.

**सत्यशोधक समाज :-**

सत्यशोधक समाज स्थापनेची सभा रामचंद्र झावरे यांच्या घरी झाली होती. महात्मा फुलेंना सत्यशोधक समाज स्थापनेची प्रेरणा ज्ञानगिरी बुवा, संत कबीराच्या ग्रंथाचा प्रभाव यातून मिळाली. २४ सप्टेंबर १८७३ रोजी सत्यशोधक समाज स्थापन झाला. सत्यशोधक समाजाचे घोषवाक्य 'सर्वसाक्षी जगत्पती । त्याला नकोच मध्यस्ती ॥ हे होते. सत्यशोधक समाजाचे पहिले अध्यक्ष जोतिराव फुले, कोषाध्यक्ष रामशेठ उरवणे तर पहिले कार्यवाहक नारायण गोविंद कडलक हे होते. या समाजाने स्त्री पुरुष समानता, विधवा पुनर्विवाह, शारीरिक व बौद्धिक स्वातंत्र्य यांचे शिक्षण समाजाला दिले. महत्त्वाचे म्हणजे, सत्यशोधक विवाह पद्धतीने विवाहाची चळवळ यशस्वी केली.

**सत्यशोधक समाज आणि स्त्रीमुक्ती :-**

सत्यशोधक समाजाच्या नियमांत "स्त्री-पुरुष यांना समान अधिकार आहेत" असा स्पष्ट उल्लेख होता. हे आधुनिक स्त्रीवादी तत्त्वज्ञानाशी मिळते जुळते विचार आहेत. दोन्ही पक्षांच्या संमतीने आणि कोणत्याही खर्चाशिवाय विवाह करणे ही सत्यशोधक विवाह पद्धती होती, यात मुलीच्या लग्नात हुंडा नव्हता. हे स्त्री पुरुषांच्या समान संमतीवर आधारित होते. सत्यशोधक समाज शिक्षणासोबतच शिवणकाम, विणकाम, हस्तकला, शेतकाम यांचे प्रशिक्षण देत असे. स्त्रियांना आर्थिक स्वावलंबन मिळवून देणे हा हेतू होता.

**हंटर आयोगापुढील साक्ष :-**

१८८२ च्या हंटर शिक्षण आयोगाला महात्मा जोतिराव फुले यांनी एक साक्ष दिली होती, यामध्ये त्यांनी सर्वांसाठी शिक्षण सक्तीचे व मोफत करावे, सर्वसमावेशकता आणि सामाजिक न्यायावर आधारित शिक्षणव्यवस्था उभारणे, भेदभावरहित, व्यावहारिक आणि लोककल्याणकारी शिक्षणाचा अंतर्भाव असावा, शेतीचे प्राथमिक ज्ञान शिक्षकांना असावे, या शिफारशी त्यांनी सरकारला केल्या होत्या.

**महात्मा फुलेंची स्त्रीविषयक तत्वज्ञानात्मक मांडणी :-**

महात्मा फुले म्हणतात, "शिक्षणाशिवाय स्त्रीची उन्नती अशक्य आहे आणि स्त्रीशिक्षणाशिवाय समाजाचे उत्थानही शक्य नाही." महात्मा फुले यांची स्त्रीसुधारणाविषयक मांडणी ही केवळ सहानुभूतीवर आधारित नसून समता, न्याय, विवेक आणि मानवतावाद या तत्वांवर आधारलेली होती.

**महात्मा फुले यांच्या कार्याचे परिणाम :-**

१. एकोणिसाव्या शतकात स्त्री शिक्षणाचा पाया मजबुत झाला.

२. विधवा पुनर्विवाह व बालविवाह विरोध चळवळीला बळ मिळाले.

३. सत्यशोधक समाजाच्या कार्यातून सामाजिक क्रांती.

४. भारतात आधुनिक स्त्रीवादाचा पाया घातला गेला.

महात्मा फुले यांच्या कार्याचे परिणाम केवळ त्यांच्या काळापुरते मर्यादित नसून आजही भारतीय समाजात जाणवतात. स्त्री पुरुष समानता, शिक्षणाचा प्रसार आणि सामाजिक न्याय यांसाठी त्यांनी रोवलेला पाया भारतीय लोकशाहीचा महत्वाचा घटक ठरला आहे.

**आधुनिक काळातील महात्मा फुले यांच्या कार्याची प्रासंगिकता आणि उपयुक्तता :-**

महात्मा जोतिराव फुले यांनी एकोणिसाव्या शतकात दिलेले विचार आणि केलेले सामाजिक कार्य आजच्या एकविसाव्या शतकातही तितकेच महत्वाचे आहेत. सामाजिक, आर्थिक असमानता यासारख्या प्रश्नांनी आजही समाजाला घेरले आहे. अशा परिस्थितीत महात्मा फुले यांची विचारसरणी समाजाला दिशा देणारी, नैतिक आधार देणारी आणि परिवर्तनासाठी प्रेरणा देणारी ठरते. म्हणूनच त्यांची उपयुक्तता आज अधिक प्रकर्षाने जाणवते.

**स्त्रीस्वातंत्र्य आणि स्त्रीसक्षमीकरण :-** आजही स्त्रियांच्या शिक्षण, रोजगार, सुरक्षा, नेतृत्व या प्रश्नावर संघर्ष सुरु आहे. महात्मा फुले यांनी स्त्रीला समान अधिकार देणारा दृष्टिकोन दिला हा दृष्टिकोन आजही समानतेच्या धोरणांच्या विचारांना आधार देतो.

**सामाजिक न्याय :-** समाजात सामाजिक असमानता अद्याप अस्तित्वात आहेत. महात्मा फुले यांचे 'सर्व समान' हे तत्व आजच्या सामाजिक न्याय, समान संधी, हक्क या धोरणांना वैचारिक आधार देते.

**शिक्षणाचा प्रसार आणि सर्वसमावेशकता :-**

आज शिक्षण सार्वत्रिक झाले असले तरी गुणवत्तेतील असमानता, डिजिटल ज्ञानाची दरी, हे प्रश्न कायम आहेत. महात्मा फुले यांचा शिक्षण हा सामाजिक परिवर्तनाचा मुख्य मार्ग आहे हा विचार आजच्या शिक्षणनीतीतही अत्यंत महत्वाचा आहे.

**विज्ञाननिष्ठ दृष्टी आणि अंधश्रध्दा निर्मूलन :-**

आधुनिक समाजात विज्ञानाची प्रगती झाली असली तरी अंधश्रध्दा, अंधविश्वास, बनवेगिरी आजही सामाजिक आयुष्यावर परिणाम करतात. महात्मा फुले यांची वैज्ञानिक, तर्कशुध्द आणि पुराव्यावर आधारित विचारसरणी आजच्या विवेकवादी चळवळींचा आधार आहे.

**स्त्री, शेतकरी आणि मजूर वर्गासाठी मार्गदर्शक विचार :-** सामाजिक व आर्थिक विषमता, बेरोजगारी, कृषी संकट, श्रमिकांचे प्रश्न आजही तीव्र आहेत. महात्मा फुले यांनी स्त्री, शेतकरी, कामगारांचे प्रश्न समजून त्यांच्या हक्कासाठी आवाज उठवला. आधुनिक ‘समावेशक विकास’ या तत्वाशी त्यांचे विचार पूर्णपणे सुसंगत राहतात.

**लोकशाही मूल्यांची जपणूक :-**

समता, स्वातंत्र्य, बंधुता आणि न्याय ही मूल्ये महात्मा फुले यांच्या विचारांशी थेट जुळतात. विविधतेत एकता राखण्यासाठी महात्मा फुले यांनी माणसात माणुसकी पाहण्याचा दृष्टिकोन दिला जो आजही लोकशाहीसाठी अत्यावश्यक आहे. आधुनिक समाजात स्त्रियांवरील अन्याय, अंधश्रध्दा, शिक्षणातील असमानता, आर्थिक दुर्बलता हे प्रश्न अद्यापही उभे आहेत. हे प्रश्न सोडवण्यासाठी महात्मा फुले यांची तत्वनिष्ठ, विवेकवादी आणि मानवतावादी विचारसरणी आजच्या काळात अत्यंत उपयुक्त ठरते. म्हणूनच महात्मा फुले केवळ इतिहासातील समाजसुधारक नसून आधुनिक भारताचे नैतिक मार्गदर्शक ठरतात.

**निष्कर्ष :-**

महात्मा फुले आणि सावित्रीबाई फुले यांना एकोणिसाव्या शतकात केलेल्या स्त्री-सुधारणा कार्याचे महत्व अमूल्य आहे. त्यांनी समाजातील दडपशाहीच्या वेड्या फोडून स्त्रीला शिक्षण, समानता, स्वातंत्र्य आणि सन्मान मिळवून देण्यासाठी प्रचंड संघर्ष केला. महात्मा फुलेंची चळवळ केवळ स्त्रीसुधारणेपुरती मर्यादित नव्हती, तर ती मानवतावादी समाजाच्या निर्मितीसाठी होती. त्यांच्या विचारांचा आणि कृतींचा वारसा आजही भारतीय लोकशाहीचे, सामाजिक न्यायाचे आणि स्त्री मुक्तीचे भक्कम अधिष्ठान आहे. त्यांच्या कार्यामुळेच भारतीय समाजाने स्त्री समानताचा मार्ग स्वीकारायला सुरुवात केली. म्हणूनच ते स्त्री सुधारणेचे अनन्यसाधारण नेते आहेत, आणि त्यांचा वारसा युगानुयुगे प्रेरणा देत राहील.

**संदर्भ ग्रंथ :-**

१. धनंजय कीर, १९७३,'महात्मा ज्योतिबा फुले आमच्या समाजक्रांतीचे जनक', पॉप्युलर पब्लिकेशन्स मुंबई
२. पंढरीनाथ सीताराम पाटील, १९९०,'महात्मा ज्योतीराव फुले यांचा अल्प परिचय', महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, मुंबई
३. सीताराम रायकर, १९८१, 'आम्ही पाहिलेले फुले', मैत्री पब्लिकेशन
४. डॉ. सदानंद मोरे, २०२३, 'महात्मा फुले यांचे वैचारिक चरित्र', सकाळ प्रकाशन
५. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, १९९२, 'जोतिचरित्र', नॅशनल बुक ट्रस्ट इंडिया
६. धनंजय कीर, डॉ. स. गं. मालशे, डॉ. य. दि. फडके (संपा), २००६, 'महात्मा ज्योतिराव फुले यांचे समग्र वाडमय', महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, मुंबई
७. डॉ. रमेश शिंदे, २०१८, 'भारतीय स्त्रीवादाचे प्रणेते जोतीराव गोविंदराव फुले', सायन पब्लिकेशन्स पुणे

**Publisher's Note:** *The views and opinions expressed in this article are solely those of the author(s) and do not necessarily reflect those of the publisher, editors, or the editorial board.*